दैनिक
छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर
मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे
मंगळवार
२८.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २९१
किंमत : ३ रू. पाने : ४
marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान –१

आठवले गँगवर मकोका

बीड पोलिस सुपर ॲक्शन मोडमध्ये ; एकाच महिन्यात दुसरी मोठी कारवाई

बीड, (प्रतिनिधी) :– सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीडमधील गुन्हेगारांचे सिंडिकेट उद्ध्वस्त करण्यासाठी बीड पोलिस ॲक्शन मोडवर आहे. जिल्ह्यात आणखी एका गँगवर मकोकांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. बनावट नोटा प्रकरण आणि गोळीबार प्रकरणात अक्षय आठवले गँगवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. गोळीबार प्रकरणात ही कारवाई करण्यात आली आहे.

बीडमधील टोळ्यांची दहशत संपवण्यासाठी बीड पोलिस ॲक्शन मोडमध्ये आहे. एका महिन्यात दोन टोळ्यावर मकोकाची कारवाई करण्यात आली आहे. बीडमधील कुख्यात आठवले गँगवर मकोका लावण्यात आहे. तसेच सहा जणा विरोधात मोक्काची कारवाई करण्यात आली आहे. अक्षय आठवले, सनी आठवले, आशिष आठवले, मनीष क्षीरसागर, प्रसाद धीवर, ओंकार सवाई या सहा आरोपीचा समावेश आहे. काही दिवसांपूर्वीच फरार सनी आठवलेने एक क्लिप सोशल मीडियावर पोस्टर करत बीड पोलिस निरिक्षकांवर गंभीर आरोप केले होते. सनी आठवले हा आधी वाल्मिक कराडसोबतच होता मात्र काही कारणास्तव त्यानं कराडची साथ सोडली. कराडची साथ सोडल्यानंतर वाल्मिक कराडनंच आपल्याला खोट्या गुन्ह्यात अडकवलं आणि आपण पुन्हा कराडसोबत आल्यानंतर तो खोटा गुन्हा मागे घ्यायला लावल्याचा दावा सनीनं केलाय आणि ही त्याच प्रकरणातली ऑडिओ क्लिप असल्याचं सनीचं म्हणणं आहे. या पोस्टमध्ये वाल्मिक कराडने डोक्यात राग ठेवत कशा पद्धतीने खोट्या गुन्ह्यामध्ये अडकवले हे सांगितले आहे. ▶▶पान २ वर

आठवले गँगचा म्होरक्या 'सनी भैय्या' आहे तरी कोण?

वाल्मिक कराड गँगनंतर आता दहशत माजवणाऱ्या आठवले गँगवर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. आठवले गँगवर पोलिसांनी मकोका लावला आहे. त्यानंतर आता गँगचा म्होरक्या सनी आठवले चर्चेत आला आहे. सनी आठवले कोण आहे याविषयी आपण जाणून घेऊया. बीडमधील कुख्यात गुंड म्हणून सनी आठवलेची ओळख आहे. खंडणी, मारहाण, बनावट नोटा छापण्याचा आणि हत्येचा प्रयत्न अशा विविध गंभीर गुन्ह्यात तो सध्या फरार आहे. मारहाण करणे, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, गोळीबार, गावठी पिस्तूल बाळगणे अशा प्रकारच्या गंभीर घटनांचे गुन्हे यापूर्वीही आठवले गँगवर दाखल आहेत. महत्त्वाचे म्हणजे अक्षय आठवले, सनी आठवले आणि

आशिष आठवले हे तिघे सख्खे भाऊ या गँगमध्ये आहेत. या तीन भावांवर अनेक गुन्हे आहेत. सनी आठवले सध्या फरार आहे.

आठवलेच्या वडिलांचा झाला होता एन्काऊंटर

आठवले आणि बंधू हे हे २०१४ साली एन्काऊंटरमध्ये ठार झालेल्या शामराव आठवले यांची मुले आहेत. शामराव आठवलेवर अपहरणाचा गुन्हा होता.सनी आठवले सोशल मीडियावर अनेक फॉलोअर्स आहेत. सनीच्या सोशल मीडियावर त्याने अनेक नेत्यांसोबतचे फोटो अपलोड केले आहेत. एवढच नाही तर त्याने काही जेलमधील फोटो देखील अपलोड केले आहे. किंग ऑफ बीड सिटी, सनी भैय्या, बीड जिल्ह्याचे आदरणीय वडील, अशी अनेक नावे सनी आठवलेला आहेत.

जवळपास २०० पोलिस 'आका'चे प्रेमी

आ.धस यांचा दावा

बीड, (प्रतिनिधी):– बीड संतोष देशमुख प्रकरणात आता सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी देखील उडी घेतली आहे. बीडमधील २६ पोलिस अधिकारी हे वाल्मीक कराडच्या मर्जीतील असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच वाल्मीक कराडच्या मर्जीतले पोलिस अधिकाऱ्यांची बीडमधून बदली करण्याची देखील त्यांनी मागणी केली आहे. तृप्ती देसाई यांच्या आरोपावर आमदार सुरेश धस यांनी प्रतिक्रिया देत म्हंटले की त्यांनी सांगितलेला २६ हा फार कमी आकडा आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले, तृप्ती देसाई यांनी सांगितलेला २६ हा फार कमी आकडा आहे. सर्व कर्मचारी पोलिस अधिकारी यांची जर बेरीज केली तर ती २०० इतकी होईल. मी लवकरच यादी करणार आहे आणि मुख्यमंत्र्यांना देणार आहे, असे सुरेश धस म्हणाले आहेत. सुरेश धस म्हणाले, फक्त २६ नाही तर १५० ते २०० अधिकारी हे वाल्मीक कराडच्या मर्जीतले असतील. तृप्ती देसाई यांनी २६ हा फार कमी आकडा सांगितला आहे. सर्व पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची बेरीज केली तर २०० इतकी होईल. त्यांनी हा आकडा कमी सांगितला आहे. मी लवकरच या सर्वांची यादी मुख्यमंत्र्यांना देणार आहे. ▶▶पान २ वर

आरोपी सुदर्शन घुलेला ३१ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी

बीड, (प्रतिनिधी):–संतोष देशमुख हत्या प्रकरणात मुख्य आरोपी असलेल्या सुदर्शन घुलेसंदर्भात एसआयटीने बीड जिल्हा न्यायालयाला पोलीस कोठडी देण्यात यावी असा अर्ज केला होता. संतोष देशमुख यांची हत्याकेल्यानंतर वाल्मीक कराडशी सुदर्शन घुले आणि विष्णू चाटेने द्रध्वनी वरून संभाषण केले होते. या संदर्भात एसआयटीला महत्त्वाचे धागेदोरे मिळाले असून सुदर्शन घुलेच्या मोबाईल मधील डाटा हस्तगत करण्यात आल्याची माहिती आहे. या डाटाचा पुढील तपास करण्यासाठी सुदर्शन घुलेला ▶▶पान २ वर

आज सर्वात मोठी घडामोड?

मुख्यमंत्र्यांना भेटून निर्णय घेण्याचं अजितदादांचं आश्वासन; अंजली दमानिया

मुंबई, (वृत्तसेवा):–ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान अंजली दमानिया यांनी संतोष देशमुख हत्येप्रकरणी तुरुंगात असलेला वाल्मिक कराडविरोधात अनेक पुरावे दिले. यानंतर या भेटीवेळी अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. या भेटीनंतर त्यांनी लवकरच याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करेन असे आश्वासन अजित पवारांनी अंजली दमानिया यांना दिले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेनंतर राज्यात वातावरण ढवळून निघालं आहे. या प्रकरणी आतापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. ▶▶पान २ वर

बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांची दादागिरी सुरूच

शेतकऱ्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याची धमकी

बीड, (प्रतिनिधी):– बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांची दादागिरी सुरुच असुन शेतकऱ्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याच्या धमक्या पवनचक्की कंपन्यांच्या आधिका–यांकडुन घडला असुन पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांनी पवनचक्की कंपन्यांच्या आधिका–यांची बैठक घेऊन त्यांना संरक्षण देण्याची हमी दिली. कंपन्यांकडुन खंडणीखोरांवर कठोर कारवाई व्हायलाच हवी मात्र पवनचक्की कंपन्यांचे अधिकारी शेतकऱ्यांची फसवणूक करून त्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याची भाषा करत असेल तर मग शेतकऱ्यांचे संरक्षण कोणी करायचे? मग पवनचक्की कंपन्यांच्या आधिका–यांची बैठक घेतली तर पिडीत शेतकऱ्यांची बैठक कधी घेणार?शेतकऱ्यांना वाली कोण ? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांना केला आहे. बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील शेतकऱ्यांची अहमदपूर ते अहिल्यानगर राज्य महामार्गावर शेतजमीन असुन २ वर्षांपासून रेन्यु पावर कंपनीने गोडाऊन साठी भाडेतत्त्वावर घेतली होती. ▶▶पान २ वर

सोयाबीन,कापूस हमीभाव,पिकविमा,अनुदान,कर्जमाफी यासाठी

किसान सभेचे जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने

बीड, (प्रतिनिधी):– सोमवार दि. २७ रोजी सोयाबीन,कापूस,तूर या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मुख्य प्रश्नांना घेऊन अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करण्यात आली. सरकारी धोरणाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी सोयाबीन कापूस तूर हे शेतकऱ्यांचे प्रमुख नगदी पिके असून या पिकांचे शासनाने घोषित केलेले हमीभाव शेतकऱ्यांना परवडणारे नाहीत. राज्य कृषी मूल्य आयोगाने शिफारशीत केलेले हमीभाव व केंद्र सरकारने प्रत्यक्ष घोषित केलेले हमीभाव यात मोठी तफावत दिसून येते. त्यामुळे हे हमीभाव शेतकऱ्यांना परवडत नाहीत. असे असतानाच केंद्र सरकार सातत्याने सोया पेंड,

कापसाच्या गाठी आयात करत आहे व तुरीवरील आयातीस शून्य आयात शुल्क करून सातत्याने मुदत वाढ देत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. शेतकऱ्यांच्या जीवांशी खेळणारा हा शासकीय हस्तक्षेप कमी करण्यात यावा. केंद्र सरकारने घोषित केलेला हमीभाव आणि राज्य कृषी मूल्य आयोगाने शिफारशीत केलेला भाव यातील तफावत राज्य सरकारने अनुदान देऊन भरून काढावी. सोयाबीन व कापूस खरेदी केंद्रावरील होणारी शेतकऱ्यांची लूट थांबवावी व शेतकऱ्यांचा सर्व शेतीमाल हमीभावाने खरेदी करावा. खरीप हंगाम २०२४ चे आलेले अतिवृष्टी चे अनुदान पी एम किसान, कृषी विभागाचा डेटा वापरून डी बी टी द्वारे देण्यात यावे. अनुदान यादीत नाव घालण्यासाठी शेतकऱ्यांना वेठीस धरू नये. तसेच कापूस सोयाबीन भावांतर अनुदान व आत्ताचे अतिवृष्टी अनुदान मोबाईल नंबर आधार नंबर लिंक नसणे ▶▶पान २ वर

प्रधान की सेवक?

शिक्षणासंदर्भात सरकार काही करू पाहते या कल्पनेनेच अलीकडे झोप उडते. राज्य असो की केंद्र, पालकांखेरीज आपले शिक्षणमंत्री हेच शिक्षणक्षेत्रासमोरचे मोठे आव्हान ठरतात. यात ताजी भर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची. त्यांच्या अखत्यारीतील 'विद्यापीठ अनुदान आयोगा'ने (यूजीसी) प्राध्यापक, कुलगुरू आदी निवडींबाबत अधिनियमांचा केलेला नवा मसुदा नव्या वादाचा केंद्रबिंदू. हा आयोग विद्यापीठांना 'आमचे निकष पाळले नाहीत, तर अनुदान व शिक्षण संस्थांना मिळणाऱ्या स्वायत्ततेच्या दर्जासारख्या विशेषाधिकारांना मुकाल,' अशी धमकी देतो. ही अरेरावी आणि कुलगुरू निवडीबाबतचा आयोगाचा 'अव्यापारेषु व्यापार' या विषयावर भाष्य करण्यास भाग पाडतो. कुलगुरू निवडीसाठी नेमायच्या शोध समितीचे अधिकार कुलपतींकडे असतील, असे आयोगाचा प्रस्तावित नियम म्हणतो. राज्यपाल हे आपापल्या राज्यातील विद्यापीठांचे पदसिद्ध कुलपती असतात. अलीकडच्या काळात नेमले गेलेले एकापेक्षा एक दिव्य राज्यपाल पाहिल्यास हा बदल झोप उडवणारा का आहे हे कळेल. कुलपती म्हणजे पर्यायाने राज्यपालांकडे अधिकार आणि राज्यपाल केंद्राने नेमलेले असल्याने कुलगुरू निवडीत थेट राजकीय हस्तक्षेप, असा त्याचा अर्थ. विरोधी पक्षांनी यावरूनच रान उठवले आहे आणि ते योग्यच आहे. तमिळनाडू आणि केरळ या राज्यांनी तर 'यूजीसी'चा हा प्रस्तावित तरतुदींचा मसुदा केंद्राने मागे घ्यावा, असा ठराव त्यांच्या विधानसभांत मंजूर केला. बिहारमध्ये भाजपचा मित्रपक्ष संयुक्त जनता दलही हा मसुदा स्वीकारायच्या मन:स्थितीत नाही. खरे तर आतापर्यंत कुलगुरू निवडीत राज्यपालांचा थेट हस्तक्षेप नव्हता. कुलगुरू निवडीसाठी नेमलेल्या शोध समितीत पूर्वी विविध प्रकारचे सदस्य असायचे. ज्या विद्यापीठाचा कुलगुरू निवडायचा, त्याच्याशी संबंध नसलेली, पण एखाद्या क्षेत्रात अत्युत्तम कामगिरी केलेली व्यक्ती आणि इतर सदस्य या शोध समितीत असायचे. या सदस्यांत संबंधित विद्यापीठाच्या अधिकार मंडळातील एकजण तसेच, इतर नामनिर्देशित सदस्य असायचे. यामध्ये राजकीय हस्तक्षेप होतच नाही, असे नाही. कारण, शोध समिती कुलगुरूपदासाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन तीन ते पाच नावांची शिफारस कुलपतींना करते आणि त्यातून कुलपती एक नाव अंतिम करतात. या अंतिम यादीत 'आपला' माणूस असेल, अशी व्यवस्था तेव्हाही केंद्र वा राज्य सरकारे करत आणि कुलपती त्यावर शिक्कामोर्तब करत. आताही काही कुलगुरूंच्या बौद्धिक/नैतिक उंचीविषयी न बोललेलेच बरे, अशी स्थिती. पण, आता या नव्या शिफारशी राज्य सरकारांचा हा अधिकार काढून घेऊन तो केंद्राला देतात. खरे तर शिक्षण हा केंद्र-राज्य अशा सामाईक सूचीतील विषय असल्याने पूर्वी किमान राज्य सरकारांनी त्यांच्या त्यांच्या विद्यापीठ कायद्यांनुसार कुलगुरू निवड पद्धतीची रचना केलेली होती. 'यूजीसी'ची भूमिका केवळ उमेदवाराच्या पात्रता निकषांपुरती होती, निवड समितीच्या स्थापनेबाबत शिफारशी करण्याची नाही. पण २०१० पासून 'यूजीसी'च्या हस्तक्षेपास सुरुवात झाली. आधी या समितीत 'यूजीसी'चा सदस्य आला आणि तो जाऊन शोध समितीचेच पूर्ण नियंत्रण आता कुलपतींकडे, म्हणजे राज्यपालांकडे आयोग देऊ इच्छितो. यासंदर्भात दोन गंभीर मुद्दे उपस्थित होतात. राज्य सरकारांकडून त्यांचे अधिकार हिरावून घेत सगळ्याच धोरणात्मक बाबींचे केंद्रीकरण हा मुद्दा पहिला. देशभरातील वेगवेगळ्या राज्यांच्या विद्यापीठांतील कुलगुरूही 'आपल्या' विचारांचे असावेत आणि त्यानिमित्ताने शिक्षणात 'आपल्या'ला हवे ते आणता यावे, असा छुपा हेतू यात उघड दिसतो. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात 'भारतीय ज्ञान प्रणाली' या विषयाच्या समावेशाच्या निमित्ताने हळूहळू ते 'संस्कार' आणले जातच आहेत. त्यात याची भर. एक प्रकारे, तमिळनाडू वा केरळसारख्या विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांतही किमान उच्च शिक्षणात आपली माणसे पेरण्याचा हेतू यामागे नाही, असेही म्हणता येणार नाही. कुलगुरू निवडीमध्ये कुलपती, म्हणजे राज्यपालांचा शब्द अंतिम करण्यासाठी जोरकस प्रयत्न होण्यामागे आणखी एक कारण आहे. ते तमिळनाडू आणि पश्चिम बंगालने कुलगुरू निवडीचा राज्यपालांचा अधिकार काढून घेण्याचे ठराव मंजूर केले त्यात आहे. तमिळनाडूला ते अधिकार राज्याकडे, तर पश्चिम बंगालला ते मुख्यमंत्र्यांकडे द्यायचे आहेत. तसे ठरावही या सरकारांनी केले आहेत. पश्चिम बंगालचे याबाबतचे विधेयक राज्यपालांकडेच मंजुरीसाठी प्रलंबित आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकार असताना, त्या सरकारनेही मुख्यमंत्र्यांकडे हे अधिकार असावेत, असा ठराव केला होता. तो महायुती सरकारने नंतर रद्दबातल केला. कुलगुरू निवडीच्या प्रक्रियेला राजकारणाचे कंगोरे आहेत, ते असे. यात एकूणच विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्था आणि ज्यांच्यासाठी या सगळ्या व्यवस्था निर्माण करायच्या, त्या विद्यार्थ्यांच्या हिताचे काय, यावर मात्र राजकीय पातळीवर कोणीच चर्चा करताना दिसत नाही. उच्च शिक्षण क्षेत्रातील अनेक माजी कुलगुरू आणि शिक्षणतज्ज्ञांनी यानिमित्ताने हेच अधोरेखित केले आहे. जाणते शिक्षणतज्ज्ञ याद्वारे हेच सांगू पाहत आहेत, की उच्च शिक्षण संस्थांना अधिक स्वायत्तता हाच शिक्षण राजकारणमुक्त करण्याचा मार्ग असला पाहिजे. कुलगुरू हा विद्यापीठाचा प्रधान शैक्षणिक आणि प्रशासनिक अधिकारी असतो. एकीकडे दहा वर्षे अध्यापनाची अट काढून उद्योग वा सार्वजनिक क्षेत्रातील उच्चपदस्थही कुलगुरू होऊ शकतील, असे गाजर दाखवायचे आणि दुसरीकडे त्याच्या निवडीवर नियंत्रण मात्र राजकीय ठेवायचे, ही स्वायत्तता नाही. ज्या हार्वर्ड, एमआयटी, प्रिन्स्टन विद्यापीठांच्या वैभवशाली शैक्षणिक परंपरेची उदाहरणे आपल्याकडे दिली जातात, त्या विद्यापीठांच्या नेतृत्व निवडीत सरकारी हस्तक्षेपाला वाव नसतो. असते ती केवळ शैक्षणिक दृष्टी, हे विसरून कसे चालेल? विद्यापीठे ही उच्च शिक्षणातील महत्त्वाची ज्ञानकेंद्रे आहेत. या विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांत देशभरातील सर्व आर्थिक-सामाजिक वर्गांतील लाखो विद्यार्थी शिकतात. त्यामुळे त्यांची एका ठरावीक वर्गासाठी असलेल्या खासगी विद्यापीठांशी तुलना करून चालणार नाही. राज्य विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवायची, तर त्यांना स्वायत्तता देणे हाच मार्ग असू शकतो आणि त्यासाठी कुलगुरू निवडीत राजकीय हस्तक्षेप नसणेच योग्य. उच्च शिक्षणाच्या धोरणाबाबत नेमण्यात आलेल्या कोठारी आयोगापासून पुढच्या सर्व आयोगांनी विद्यापीठांच्या शैक्षणिक गुणवत्तेतील कुलगुरूंची भूमिका ठामपणे अधोरेखित केलेली असताना, उच्च शिक्षणाच्या नियमनाची जबाबदारी असलेल्या आयोगाने धोरणात्मक बाबींत ढवळाढवळ का करावी? दिल्ली विद्यापीठाचे माजी कुलगुरू दिनेश सिंग यांनी माध्यमांत यूजीसीच्या नव्या मसुद्याबाबत चर्चा करताना भारतातील पहिल्या महिला कुलगुरू हंसा मेहता यांच्या निवडीचे उदाहरण दिले. ''हंसा मेहता पीएचडी सोडा, पदव्युत्तर पदवीधारक नसूनही बडोद्यातील महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या कुलगुरू झाल्या, कारण त्यांचा शैक्षणिक दृष्टिकोन. त्यांच्या नियुक्तीमध्ये बडोदा कॉलेजचे विद्यापीठात रूपांतर करण्यात पुढाकार घेतलेले सरदार वल्लभभाई पटेल यांचेही द्रष्टेपण होते. त्या १९४९ ते १९५८ अशी नऊ वर्षे कुलगुरू होत्या. त्यांना त्यांच्या शैक्षणिक कल्पना राबविण्यास पूर्ण मुभा देण्यात आली होती आणि त्याचा त्यांनी उपयोग करून अनेक उपक्रम राबवले. देशातील त्या काळातील तरुण बुद्धिमान शिक्षकांना त्यांनी विद्यापीठात आणले. साठच्या दशकात 'द अमेरिकन मॅथेमॅटिकल मंथली' या मासिकाने बडोदा विद्यापीठातील गणिताचा अभ्यासक्रम गणित अध्यापनासाठीचा वस्तुपाठ असल्याची प्रशंसा केली होती''. एरवी गुजरातचे नको ते धडे सर्रास घेतले जातात. शैक्षणिक स्वायत्ततेचा हा गुजराती धडा घेऊन शिक्षणमंत्र्यांनी आपण प्रधान की सेवक हे दाखवून द्यावे. त्यासाठी ही चांगली संधी आहे.

प्रवाशाने तिकीट काढले नसल्याने कारवाई

निलंबित बस वाहकाने तणावात जीवन संपवलं

बीड, (प्रतिनिधी):-राज्य परिवहन महामंडळाच्या माजलगाव आगारात वाहक म्हणून कार्यरत असलेले चिंचाळा येथील दत्ता अंबलकर या वाहकाने २६ जानेवारीच्या मध्यरात्री शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. एका वाहकाने तिकीट न काढल्याने केलेल्या कारवाईत वाहक अंबलकर यांना निलंबित करण्यात आले होते, या तणावातूनच त्यांनी टोकाचा निर्णय घेतला, हा महामंडळाच्या चुकीच्या व्यवस्थेचा बळी आहे, असा आरोप अंबलकर यांच्या नातेवाइकांनी केला आहे. दत्ता आंबळकर हे गेल्या दहा वर्षापासून परिवहन महामंडळाच्या माजलगाव आगारात वाहक म्हणून कार्यरत होते. महिना भरापूर्वी एका प्रवाशाने तिकीट न घेता प्रवास केल्याचे उघडकीस आल्यानंतर वाहक अंबलकर यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. या कारवाईमुळे वाहक अंबलकर हे तणावात होते. यानंतर ते १२ जानेवारीपासून कोणालाही न सांगता घरातून निघून

गेले होते. अंबलकर यांच्या वडिलांनी माजलगाव पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद केली होती. दरम्यान, २६ जानेवारीच्या मध्यरात्री अंबलकर यांनी आपल्या शेतात येत शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. आज सकाळी यांचे वडील शेतात गेल्यावर ही बाब उघडकीस आली. वडवणी पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामाकरून शवविच्छेदनासाठी कुप्पा येथील आरोग्य केंद्रात पाठवले. नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिल्याने दवाखान्यामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यानंतर माजलगाव बस स्थानकाचे आगार प्रमुख कोळपकर यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांनी कुप्पा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात येऊन नातेवाईकांची समजूत काढली. कुटुंबातील एका व्यक्तीला महामंडळात नोकरीला घेता येईल असे आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. चिंचाळा येथे दुपारी चार वाजण्याच्या दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आले. * चुकीच्या व्यवस्थेचा बळी : महामंडळाच्या चुकीच्या नियमांमुळे माझ्या भावाने आत्महत्या केली. प्रवाशाने तिकीट न काढता प्रवास केला यास वाहकाला जबाबदार धरून निलंबित करणे ही चुकीची व्यवस्था आहे. - महादेव अबलकर, मयत व्यक्तीचे भाऊ * विभागीय कारवाई होती : सदरील वाहकावर कारवाई विभागीय कार्यालयामार्फत कारवाई करण्यात आली होती. यामुळे मला यामध्ये अधिकचे काही सांगता येणार नाही. - एस. डी. कोळपकर, आगार प्रमुख माजलगाव

डॉ.अशोक थोरात यांच्याबद्दल दमानियांचा मोठा गौप्यस्फोट

मुंबई, (वृत्तसेवा):-''धनंजय मुंडेंच्या कृपेने आणि वाल्मिक कराडच्या कृपेने त्यांची बदली पुन्हा बीडमध्ये झाली. आम्हाला काल त्यांच्या एका मोठ्या हॉटेलबद्दल कळलं आणि ते लक्झरी हॉटेल आहे अंबेजोगाईला, ते बघून थोडासा धक्का बसला'' असं समाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया म्हणाल्या. त्या संतोष देशमुख यांचा पोस्टमार्टम रिपोर्ट देणाऱ्या डॉ. अशोक थोरात यांच्याबद्दल बोलत होत्या. वाल्मिक कराडवर सुद्धा याच अशोक थोरात यांनी उपचार केल्याच बोलल जातय. आता अंजली दमानिया यांनी डॉ. अशोक थोरात यांच्यावर काही गंभीर आरोप केले आहेत. ''ही व्यक्ती जर संतोष देशमुख यांच्या पोस्टमार्टम रिपोर्टची सगळी डिटेल्स देणार असेल, तर यांनी योग्य कारवाई केली की नाही अशी शंका मनात येते. कारण हे जेवढे भ्रष्ट लोक आहेत ना, ते काय वाटेल ते करतात पैशासाठी'' असं अंजली दमानिया म्हणाल्या. ''चौकशी करूया अनेक गोष्टी पुढे येतील. त्यांची दोन जोडपत्र आहेत प्रत्येक. याच्या पहिला जोडपत्रात बारा आरोप आहेत, अगदी मोठे की कोविड काळात त्यांनी आठ कोटी, दोन कोटी, एक कोटी असे अनेक आरोप त्यांच्यावर आहेत. जोडपत्र एकमध्ये पण आहेत. जोडपत्र दोनमध्ये आरोप होते. असे २४ आरोप त्यांच्यावर होते ते अजून प्रलंबित आहेत'' असं अंजली दमानिया म्हणाल्या. ''अशोक थोरात यांनी दोनदा वीआरएसची मागणी केली. ती शासनाने रिजेक्ट केली, कारण अशा व्यक्तीविरुद्ध एवढ्या मोठ्या प्रमाणावर जेव्हा आरोप होते, पेंडिंग आरोप आहेत, त्यांना वीआरएस सुद्धा घेऊ दिला गेला नाही'' असं अंजली दमानिया म्हणाल्या. ''असा व्यक्ती बीडमध्ये असेल, तर वाल्मिक कराडला आरामात ठेवणारच ना, वाल्मिक कराडला पहिल्यांदा हॉस्पिटलमध्ये आणलं गेलं होतं, पण त्याची बेसिक तपासणी करून पाठवलं. दुसऱ्यांदा आणलं, काहीही गरज नव्हती हॉस्पिटलमध्ये आणायची पण तरी तिथे ठेवलं गेलं, मग पुन्हा आम्ही ओरड केल्यानंतर तिथून हलवलं'' असं दमानिया म्हणाल्या. ''पोलिसांवर देखील कारवाई झाली पाहिजे. जे तिन्ही ऑफिसर आहेत, प्रशांत महाजन, राजेश पाटील आणि बारगळ या तिघांवर गुन्हेगार म्हणून जोपर्यंत कारवाई होत नाही. अशोक थोरात सारख्या डॉक्टर्सवर होत नाही तोपर्यंत प्रत्येक असा गुन्हेगार आपापल्या ठिकाणी कम्फर्टेबल असतो आणि त्यांना कम्फर्टेबल करणारे धनंजय मुंडे आहेत म्हणून परत आपण त्यांच्या राजीनामाची मागणी करतोय'' असं अंजली दमानिया म्हणाल्या. ''अनेक गोष्टी जसं मी ते म्हटलं पियुष इन नावाच एक मोठं हॉटेल बांधलं. त्यांचं हॉस्पिटल देखील आहे. माझा एका सिविल सर्जन विरुद्ध जो अशा गोष्टी करतोय, जो भ्रष्टाचार करतोय, त्याच्या विरुद्धचा माझा लढा आहे'' असं अंजली दमानिया म्हणाल्या. ''भ्रष्टाचार फक्त दोन वेळा जोडपत्र देऊन होत नाही, त्याचे डिटेल इन्वेस्टीगेशन झालं पाहिजे आणि जे जे पैसे त्यांनी खाल्लेत ते रिकव्हर झाले पाहिजे. त्यांच्याकडे इतकी अफाट संपत्ती आली कुठून? आणि ते एक शासकीय कर्मचारी आहेत. चौकशी झाली पाहिजे'' अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली.

पान १ वरून

आठवले गँगवर...

* सनी आठवले आणि आशिष आठवले फरार : १३ डिसेंबरला बीड जिल्ह्यात एक गोळीबाराची घटना घडली होती. या गोळीबारात १३ राऊंड फायर करण्यात आल्या होत्या. या प्रकरणी गँगवर मकोका लावण्यात आला आहे. मकोका लावण्यात आलेल्या या सहा आरोपींपैकी सनी आठवले आणि आशिष आठवले फरार आहे. या गँगवर गंभीर स्वरूपाचे १९ गुन्हे दाखल आहेत. संघटित गुन्हेगारीमध्ये खून , दरोडा, खुनाचा प्रयत्न, बलात्कार खंडणी,लुटमार, बनावट नोटा, मारहाण असे गुन्हे आहेत. याचा अधिक तपास पोलिस करत आहे. या टोळीवर कोणाचा राजकीय वरदहस्त होता का? असा देखील सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. * सनी आठवलेवर देशद्रोहाचा गुन्हा : डिसेंबर महिन्यात जुन्या वादातून अक्षय आठवले गँगने बदनामी झाल्याच्या रागातून घरात घुसून गोळीबार करण्यात आला होता. त्यानंतर सनी आठवले हा फरार आहे. बनावट नोटा तयार करून चलनात आणल्याच्या प्रकरणी सनी आठवलेवर देशद्रोहाच्या कलमाखाली गुन्हा नोंद झालेला आहे. आठवलेचे राजकीय नेत्यांशी देखील संबध आहे. आठवले आधी वाल्मिक कराडसोबतच काम करत होता. तो दिपज्योत ग्रुपचा संस्थापक अध्यक्षही आहे. याच ग्रुपच्या माध्यमातून त्याची धनंजय मुंडे यांच्याशीही जवळीक वाढली. मात्र काही कारणाने त्यांच्यात वाद झाले आणि त्यानंतर आठवले आमदार संदीप क्षीरसागर यांच्याकडे गेला.

जवळपास २०० पोलीस...

या सर्वांची बदली बीडच्या बाहेर नव्हे तर मराठवाड्याच्या बाहेर करावी, असेही मी त्यांना सांगणार आहे. पुढे बोलताना सुरेश धस म्हणाले, आकाचे पोलिस दलातील जे प्रेमी आहेत. आतापर्यंत एसपींनी पोलिस दलातच कसे ठेवले. मी कितीतरी वेळा याबद्दल बोललो आहे. महादेव मुंडेचे आरोपी आकाच्या मुलाच्या अवतीभवती फिरत होते. ते लगेच गायब झाले. त्या डीवायएसपी यांनी देखील अजून चार्ज घेतला नाही. ते सुद्धा आकाचेच आहेत, असा आरोप सुरेश धस यांनी केला आहे. सुरेश धस म्हणाले, महादेव मुंडेचे आरोपी सापडले पाहिजेत. ते १५ दिवसांच्या आत जेलमध्ये गेले पाहिजेत. त्याची हत्या होऊन १५ महीने झाले. अतिशय निर्घृण हत्या झाली. कॉलेजच्या ग्राऊंडमध्ये मारण्यात आले. त्यानंतर तहसीलदाराच्या दारात नेऊन टाकण्यात आले. एसपींनी ज्या पद्धतीने यंत्रणा हलवायला हवी, तशी यंत्रणा हलवली जात नाही, असेही सुरेश धस म्हणाले. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी डॉक्टरांवर केलेल्या आरोपांवर भाष्य करताना सुरेश धस म्हणाले, डॉ. अशोक थोरात हा चांगला माणूस आहे. अंजली दमानिया यांनी चुकीची माहिती दिली. डॉक्टरांचीही चौकशी करावी लागेल. संतोष देशमुखांचा पोस्टमॉर्टम रीपोर्ट हा अतिशय क्लियर आहे.

पान १ वरून

संतोष देशमुखांचे डोळे जाळलेले नव्हते हे आम्हीही मान्य करतो. पण त्यांना मारहाण केलेली होती. मला ही सर्व माहिती मिळाली. त्यानंतर मग माझा संताप झाला. मी हा विषय सभागृहात मांडला आणि मी त्या भूमिकेवर आजही ठाम आहे, उद्याही असेन, असे धस यांनी म्हंटले आहे.

सोयाबीन, कापूस हमीभाव...

तसेच बोटांचे ठसे न लागणे या कारणांमुळे ज्यांच्या केवायसी प्रक्रिया पूर्ण होत नाहीत अशांची तोच व्यक्ती असल्याची खात्री करून त्यांना अनुदान देण्याची व्यवस्था करावी.सन २०२४ खरीप हंगाम अतिवृष्टीने बाधित झालेल्या शासकीय अनुदानाच्या धरतीवर सर्व शेतकऱ्यांचा पिक विमा लवकरात लवकर संबंधित शेतकऱ्यांना वाटप करावा. विधानसभा निवडणुकीत वचन नाम्यात घोषणा केल्याप्रमाणे महायुतीने सर्व शेतकऱ्यांचे रुपये तीन लाखांपर्यंतचे पीक कर्ज या आर्थिक वर्ष अखेरपर्यंत माफ करावे व शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे. खरीप २०२३ च्या रिव्ह्यू झालेल्या तक्रारींची लॉगिनला दिसणारी पिक विमा रक्कम तात्काळ जमा करण्यात यावी.शक्तीपिठ महामार्ग रद्द करावा. या प्रमुख मागण्या करण्यात आल्या. या मागण्यांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्याशी शिष्टमंडळाची सविस्तर चर्चा होऊन सोयाबीन खरेदीस मुदतवाढ हमीभाव कर्जमाफी या धोरणात्मक मागण्या शासनास तातडीने कळविण्यात येतील पण रेंगाळलेले अतिवृष्टी अनुदान व पिक विमा वितरण सोयाबीन कापूस खरेदी अरे मधील अनागोंदी कारभारा संदर्भात ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दालनात संबंधित संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत किसान सभेच्या प्रतिनिधीची जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक लावली. निदर्शना वेळी बोलताना किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.अजय बुरांडे म्हणाले की, कष्टकरी शेतकऱ्यांनो आपण आपल्या मूलभूत प्रश्नांसाठी शेतकरी म्हणून एकत्र येऊया तरच आपला लढा यशस्वी होऊ शकतो ही भूमिका मांडण्यात आली आणि हीच भूमिका व्यापक प्रमाणात गावागावात घेऊन जाण्याचे आवाहन केले. या निदर्शनामध्ये बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातल्या प्रतिनिधी स्वरूपातील शेतकऱ्यांसह कार्यकर्ते व जिल्हा कमिटी सदस्य कॉ.मुरलीधर नागरगोजे,कॉ.भगवान बडे,कॉ.कृष्णा सोळंके, कॉ. बळीराम देशमुख, कॉ.महादेव शेरकर, कॉ.गंगाधर पोटभरे,सय्यद खुर्शीद,कॉ.विष्णू देशमुख, कॉ. रवींद्र देवरवडे, कॉ. दादासाहेब सिरसाट,भानुदास देशमुख, हनुमंत सोळंके, कॉ. रामलिंग पिसुरे, कॉ. अशोक डाके आदी उपस्थित होते.

बालाघाटावरील...

शेतकऱ्यांना एकरी ३० हजार रूपये प्रतिवर्ष भाडेतत्त्वावर शेतजमीन घेतली. त्यांना वार्षिक भाडेही दिले मात्र जाताना जमिन पुर्ववत करून देण्याचे बांधबंदिस्ती, खडकाळ जमिनीत गाळ टाकुन देण्याचे आश्वासन मात्र साफ विसरून गेले आज दि.२७ कंपनीच्या गाड्या जागा खाली करत असताना

पान १ वरून

शेतकऱ्यांनी गाड्या अडवून विचारणा केली असता त्यांना गाड्या सोडुन द्या अडवु नका अन्यथा पोलिस केस करून तुरुंगात टाकु अशी धमकी दिल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.आता त्यांनी आमच्यावर गुन्हे दाखल करूनच पहावेत असे महादेव सदाशिव कदम, बाबासाहेब कदम,संजय घरत,विष्णु घरत यांनी म्हटले आहे. * अगोदर म्हटले बांधबंदिस्ती करून देऊ आता म्हणतेत पोलिस केस करून तुरुंगात टाकु :- महादेव सदाशिव कदम : पवनचक्की कंपन्यांना आम्ही अगोदर जागा देत नव्हतोच.तेव्हा विनवनी केल्यानंतर तयार झालो.परंतु दंड मोडला,चिरे काढले तवाच आम्ही म्हणलं आमच्या रानाचं वाटुळं व्हाय लागलंय आम्हाला शेतजमीन नाही द्यायची.तेव्हा म्हणले आम्ही जाताना वाहनांच्या वावरामुळे खडकाळ होणा-या जमिनीत तलावातील गाळ टाकु, तसेच पहिल्या सारखं दंड आणि बांधबंदिस्ती करून देऊ पण आज सगळ्या गाड्या सामान घेऊन चालल्या आम्ही आधिका-यांना विचारले असता अगोदर म्हणले ४-८ दिवसांनी येऊन करून देऊ.नंतर तर म्हणले गाड्या सोडुन द्या नाहीतर पोलिस केस करून तुरुंगात टाकु. मग आम्ही म्हणलो आता पोलिस केस करूनच दाखव बघु काय होईल ते अशी संतप्त प्रतिक्रिया महादेव सदाशिव कदम यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली. * पोलिस अधिक्षक नवनीत कांवत साहेब ; पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांप्रमाणे पिडीत शेतकऱ्यांची बैठक कधी घेणार?? :- डॉ.गणेश ढवळे : पोलिस अधिक्षक नवनीत कांवत यांनी २ जानेवारी रोजी बीड जिल्ह्यात पवनचक्की उभारताना त्रास होऊ नये म्हणून सौर व पवन ऊर्जा प्रकल्प अधिकाऱ्यांची बैठक घेतली. आणि दलाल खंडणीखोरांना घाबरू नका ,गावगुंड खंडणी मागत असतील तर जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार करा. स्थानिक पोलिसांचे नंबर ठेवून त्यांना माहिती द्या आणि संकट समय ११२ नंबरला फोन करा अशा प्रकारच्या विविध सूचना दिल्या परंतु हे पवनचक्की कंपनी वाले धुतल्या तांदळासारखे अजिबात नाहीत. त्यांनी बीड जिल्ह्यातील कायदा अनुसूव्यवस्था बाधित केले आहे त्यांचे रक्षण करणे हे पोलिसांची जबाबदारी आहे त्याचबरोबर इथल्या शेतकऱ्यांना संरक्षण देणे. पवनचक्की कंपन्यांकडून त्रास होत असेल तर त्यांचे संरक्षण करणे हि सुद्धा त्यांची जबाबदारी आहे.त्यामुळे पिडीत शेतकऱ्यांची बैठक पोलिस अधीक्षक साहेब कधी घेणार असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.

आरोपी सुदर्शन...

३१ जानेवारीपर्यंत पोलीस कस्टडी देण्यात आली आहे. संतोष देशमुख हत्याकांड आणि मकोका अधिकारी अप्पर पोलीस अधीक्षक किरण पाटील तसेच सरकारी पक्षाकडून वकील बाळासाहेब कोल्हे तसेच आरोपीचे वकील अनंत तिडके बीड न्यायालयात हजर होते. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी सुदर्शन घुले याच्या मोबाईल तपासणीसाठी एसआयटी कडून आज

पान १ वरून

पोलीस कस्टडीची मागणी करण्यात आली होती. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर ३१ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे. आरोपीचे जप्त केलेल्या ०२ मोबाईल पैकी एक मोबाईलचे लॉक ओपन झालेले नसुन आरोपीकडुन मोबाईल लॉक ओपन करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. असे सांगण्यात आले.

आज सर्वात मोठी घडामोड...

त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई केली जात आहे. याच प्रकरणी आरोपी असलेल्या वाल्मिक कराडवरही मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी वाल्मिक कराडची तब्येत बिघडल्यानं त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्याच्यावरील दोन दिवस उपचार सुरु होते. या उपचारावर अंजली दमानिया यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. यानंतर अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे भेटीसाठी वेळ मागितली होती. अखेर आज संध्याकाळी अंजली दमानिया आणि अजित पवारांची भेट झाली. या भेटीनंतर अंजली दमानिया यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी अजित पवारांसोबत काय चर्चा झाली, याबद्दलची सविस्तर माहिती दिली. ''मी २५ ते ३० मिनिटे त्यांना भेटली. हे माणुसकीला काळिमा फासण्याचे कृत्य आहे, असे त्यांनी मला सांगितले. मग त्यावर मी त्यांना तुम्ही राजीनामा का घेत नाहीत, असे विचारले. मी त्यांना सर्व पुरावे दिले. आज मी त्यांना धनंजय मुंडे, राजश्री मुंडे आणि वाल्मिक कराड यांचे एकत्र बिझनेस कसे आहेत? त्यांच्या कंपनीत आर्थिक नफा कसा मिळतो? ऑफिस ऑफ प्रॉपर्टीमध्ये हे सर्व कसं बसतंय? त्यामुळेच तुम्ही कोणत्याही परिस्थितीत तुम्ही राजीनामा घ्यायला हवा याबद्दलचे सर्व पुरावे दिले'', असे अंजली दमानिया म्हणाल्या. ''वाल्मिक कराडचे समर्थक हे दहशतवादी आहेत. त्यांनी बीडमध्ये मोठ्या प्रमाणात दहशत पसरवली आहे. त्याचे सर्व फोटो, रिल्स मी त्यांना दाखवले. त्यांनी ते सर्व शांतपणे पाहिलं. त्यांनी मला असं सांगितलंय की उद्या दुपारी १२ वाजता त्यांची आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मीटिंग आहे. त्यावेळी आम्ही तुम्ही दिलेल्या या सर्वच्या सर्व कागदपत्रांवर चर्चा करु. मुख्यमंत्र्यांशी याबद्दल चर्चा केल्यानंतर आम्ही पुढचा निर्णय घेऊ'', असे अंजली दमानियांनी म्हटले. ''मला खात्री आहे की जनभावना आहे, आक्रोश आहे, जे कृत्य झालं ते फारच निर्घृण होत. त्यामुळेच आपण हा लढा देत आहोत. हे देखील मी त्यांना सांगितलं. संतोष देशमुख यांच्यासोबत झालेले कृत्य यापुढे कधीही होऊ नये, असं महाराष्ट्रात घडू नये, असं त्यांचंही म्हणणं आहे. त्यामुळेच धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणं तातडीने आवश्यक आहे. उद्या दुपारी मुख्यमंत्र्यांना भेटून हे सर्व कागदपत्र दाखवू आणि योग्य तो निर्णय घेऊ'', असे अंजली दमानिया म्हणाल्या.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

प्रजासत्ताक दिनानिमित्त एम एस वस्तानवी इंटरनॅशनल स्कूल येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम मुफ्ती उमर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शाळेचे विद्यार्थ्यांनी विविध कला व संस्कृतीवर आधारित नृत्य सादर करून प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक मौलाना मुबीन , हाफिज अनिस, मौलाना सिराज, मुफ्ती राज, हिमायत फाउंडेशन चे शेख मुजीब यांच्यासह सर्व शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशभक्तीने प्रेरित असा हा सोहळा अतिशय स्मरणीय ठरला.

विजयसिंह पंडित आमदार व्हावेत म्हणून 'महारुद्र अभिषेक' नवस फेडला

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील ग्रामदैवत असलेले श्री. चिंतेश्वर संस्थान येथील महादेवाच्या मंदिरात नवस बोलला आणि तो पुर्ण झाला की फेडण्याची परंपरा कायम राखली जाते. श्री विजयसिंह शिवाजीराव पंडित हे आमदार होण्यासाठी बोललेला नवस फेडला. श्री.शाम म्हेत्रे यांनी विजयसिंह पंडित आमदार व्हावेत ११ ब्रह्मनांचा महारुद्र अभिषेक करण्याचा संकल्प केला होता. रणवीर पंडित यांच्या हस्ते महाआरती करून पुर्ण केला .२०२४ च्या गेवराई विधानसभा निवडणुकीत विजयसिंह पंडित मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. मायबाप जनतेनी राजे साहेबांना विधानसभेत पाठवले. आपला नेता आमदार झाल्याचा आनंद नवस बोललेले श्री शाम

म्हेत्रे यांना होता. नवस फेडायचा असा संकल्प करत दिनांक २७ जानेवारी सोमवार रोजी चितेंश्वर संस्थान येथे ११ ब्रह्मनांचा महारुद्र अभिषेक करून नवस फेडला यावेळी श्री रणवीर काका पंडित व श्री शाम म्हेत्रे यांच्या हस्ते आरती करण्यात आली यावेळी शिवछत्र परिवारातील असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

द बा घुमरे पब्लिक स्कूल बीड येथे भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

छत्रपती संभाजी राजे शिक्षण प्रसारक मंडळ पारगाव (घुमरा) संचलित द बा घुमरे पब्लिक स्कूल बीड येथे भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला प्रभात फेरीनंतर संस्थेचे सचिव श्री दीपकदादा घुमरे सर यांच्या हस्ते महापुरुषांचे प्रतिमा पूजन करून राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री दीपकदादा घुमरे सर, प्रमुख पाहुणे ऍड श्री गोविंद शिराळे सर, श्री राहुल निकम सर, श्रीमती प्रतीक्षा हिंगणे मॅडम, आयकॉन इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य श्रीमती पिंकी अग्रवाल मॅडम ह्या होत्या मान्यवरांच्या सत्कारानंतर शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी यांनी अतिशय सुंदर कवायत संचालन सादर केले.

त्यानंतर कु.अनुष्का आदमाने, कु.वेदिका राठोड, कु घोळवे श्रुती आदी विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त भाषणे सादर केली. तशेच देशभक्तीपर गीतांवर नृत्याविष्कार सादर करण्यात आले ,कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ऍड श्री गोविंद शिराळे सर , श्री राहुल निकम सर, श्रीमती प्रतीक्षा हिंगणे मॅडम,यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून स्वत:च्या पाऊलखुणा निर्माण कराव्यात : आ मोहनराव सोळंके

गरीब परिस्थिती आहे. म्हणून शिक्षण थांबवू नका : डॉ .राधाकिसन डाके

माजलगाव । प्रतिनिधी

सध्या स्पर्धेचे युग आहे. या युगात विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आवडीचे क्षेत्र निवडून त्या क्षेत्राम ध्ये मोठे काम करून त्या क्षेत्रात स्वतःच्या पाऊलखुणा निर्माण कराव्यात असे आव्हान माजी आमदार मोहनराव सोळंके यांनी केले तर विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना गरिबी परिस्थिती आहे. म्हणून आपले शिक्षण थांबवू नये ही परिस्थिती फक्त शिक्षणच बदलू शकते असे मत प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. राधाकिसन डाके यांनी व्यक्त केले. शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या शार्दुलेश्वर शिक्षण

संस्थेच्या रामेश्वर विद्यालयाच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन समारंभ प्रसंगी सोळंके, डाके बोलत होते. शार्दुलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित रामेश्वर विद्यालय उमरी या शाळेच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा २६ जानेवारी रोजी सकाळी १० वा. नियोजित जागेवर करण्यात आला होता यावेळी शार्दुलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार मोहनराव सोळंके, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. सितारामजी शर्मा, संत नारायण बाबा वांगी संस्थांचे अध्यक्ष ह. भ. प. एकनाथ महाराज माने, शार्दुलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामकृष्ण सोळंके, हृदयरोग तज्ञ डॉ. राधाकृष्ण डाके, पत्रकार तुकाराम येवले, सुभाष नाकलगावकर, आसाराम घायतिडक, रामभाऊ घायतिडक यांची प्रमुख उपस्थिती होती. भूमिपूजन सोहळ्यास विद्यार्थी शिक्षक गावातील नागरिक म ोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशश्री पोटे,दिव्या घायतिडक तर आभार अम्रता घायतिडक ने केले.

२६ जानेवारी प्रजासत्ताकदिन व माननीय स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त गंज पेठ पुणे येथील महात्मा फुले वाडा समता भूमीमध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये २५० विद्यार्थ्यांचा सहभाग होता, यावेळी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक, मेडल, पॅड, रंगपेटी आदींचे बक्षीस वितरण शिवसेना शिंदे गटाचे पुणे शहर जिल्हा शिक्षक शिक्षकेतर संघाचे प्रमुख अनिल गडकरी सर यांच्या हस्ते करण्यात आले होते, यावेळी प्रमुख पाहुणे गौरव साइन कर उपशहर प्रमुख शिवसेना, रेड हाऊस फाउंडेशनचे ऋषिकेश नवले, उद्योजक निखिल चाबुकस्वार, पवित्र नाम देवालय कार्याध्यक्ष अविनाश सूर्यवंशी, शिवसेना शिंदे गटाचे कसबा विधानसभा प्रमुख निलेश जगताप, समन्वयक आकाश गायकवाड, उपविभाग प्रमुख सागर घोलप, कसबा विभाग संघटक अतुल कच्छावे, विभाग प्रमुख संतोष कांबळे, या स्पर्धेचे परीक्षक राहुल वाघमारे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते

आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली मनोज दादा जरांगे पाटलांची भेट

मराठा आरक्षणाबाबतच्या मागण्या लवकरात लवकर मान्य करण्याची शासनाकडे विनंती

बीड । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी २५ जानेवारी रोजी उपोषण सुरू केले आहे. त्याठिकाणी जाऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी रविवारी रोजी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. तसेच जरांगे पाटलांच्या मागण्या लवकरात लवकर मान्य करण्याची शासनाकडे विनंती केली आहे. २५ जानेवारी पासून

अंतरवली सराटी येथे मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या बाबतीत सगेसोयरे अंमलबजावणी, हैद्राबाद गॅझेट करण्याची मागणी घेऊन आंदोलन सुरू केले आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मनोज जरांगे यांचे हे सातवे उपोषण आहे. बीड विधानसभा मतदारसंघाचे आम दार संदीप क्षीरसागर यांनी अंतरवली सराटी येथील उपोषणस्थळी जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. तसेच त्यांना तब्येतीची काळजी घेण्याची विनंती केली.

तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाटी या शाळेमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी प्राचार्य एस आर खोसेसर हे होते त्याचबरोबर गावातील प्रतिष्ठित नागरिक सरपंच बळीराम शिरसाट उपसरपंच महादेव अण्णा खोसे अंधापुरीचे सरपंच सौ जगताप ताई ग्रामपंचायत सदस्य अनिल खोसे शहादेवराव खोसे रामहरी भागडे सुंदर तात्या खोसे अशोक तात्या पांचाळ संजय खोसे सेवा सहकारी सोसायटी

चेअरमन रंगनाथ शिरसाट ग्राम पंचायत सदस्य काळे माजी सरपंच डॉक्टर निवांत चव्हाण कचरू काळे श्रीहरी खोसे मा चेअरमन सेवा सहकारी सोसायटी जगन्नाथराव काळे अविनाश राहींज प्रतापराव खोसे ज्येष्ठ नागरिक अनिल भोसले सोमनाथराव पाटील संपादक दैनिक झुंजार सेनापती श्रीकृष्ण भागडे उर्फ पिंटू शेठ माजी सरपंच सुनील रावजी खोसे दिगंबर भाऊ खोसे पोलीस पाटील विशाल राहींज नितीन शिरसाट गजानन शिरसाठ शिवाजी बागडे विक्रम खोसे शिवाजी बजरंग खोसे माजी सैनिक आत्माराम खोसे इत्यादी सह अनेक शेकडो नागरिकांची महिला बंधू-भगिनींची उपस्थिती होती विद्यालय मध्ये सर्व विद्यार्थी व सर्व पालक सर्वांना फेटे बांधून विद्यालयाने स्वागत केले.

ग्रामीण विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

नेकनूर । प्रतिनिधी

येथील ग्रामीण माध्यमिक विद्यालयात ७६ व प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड . जगदीशरावजी शिंदे साहेब हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प.नाना महाराज कदम, वनश्री सखाराम शिंदे , कल्याणराव शिंदे हे उपस्थित होते . सुरुवातीस संस्थेचे सचिव ऍडव्होकेट जगदीश रावजी शिंदे साहेब यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले . विद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी यांनी तयार केलेल्या अंकाचे प्रकाशन यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या कदम के .के . ड . जगदीशरावजी शिंदे व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते करण्यात आले . आपण सारे वाचूया या अंकाचे संपादन प्राचार्य कदम के .के . यांनी केले तर विज्ञान झंकार या अंकाचे संपादन श्री रुचके आर .के .यांनी केले . कन्या या अंकाचे संपादन प्राध्यापक कांबळे अशोक यांनी केले आणि कला विश्व या अंकाचे संपादन मंगेश रोटे यांनी केले . प्रमुख पाहुणे सखाराम शिंदे , जगदिशराव शिंदे आणि प्राचार्या कदम मॅडम यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले .या अंकासाठी शाळेच्या प्राचार्या कदम के .के 'यांनी प्रेरणा दिली . नंतर शाळेतील विद्यार्थ्यांची प्रभात फेरी गावातून काढण्यात आली . शाळेत विद्यार्थी एकत्र आल्या नंतर देशभक्तीपर गीते, नृत्य ,भाषणे सादर करण्यात आली . नंतर आरोग्य विभागामार्फत एड्स जनजागृती सप्ताह साजरा केला होता . त्याबद्दल रांगोळी स्पर्धेतील प्रथम द्वितीय आणि तृतीय विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले . यावेळी आरोग्य विभागाच्या मोहोळकर मॅडम या उपस्थित होत्या नंतर विद्यार्थ्यांना खाऊ देऊन कार्यक्रमाचा । समारोप करण्यात आला . या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल सर्व प्रमुख पाहुणे , विद्यार्थी आणि सर्व शिक्षकांचे प्राचार्या कदम के.के. यांनी आभार मानले .

सक्सेस पब्लिक स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

शहीद झालेल्या व सध्या कर्तव्यात असलेल्या सैनिकांना व त्यांच्या कुटुबियाना मोफत नेत्र उपचार देणार: डॉ स्वानंद कुलकर्णी

माजलगाव । प्रतिनिधी

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त सक्सेस स्कूलमध्ये माजलगाव येथील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ स्वानंद कुलकर्णी साहेब, श्रीकृष्ण सेठ शेजुळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी या कार्यक्रमास उपस्थित यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे निरंजन सर वाघमारे निखिल सर वाघमारे , विनायक रत्नपारखी व शिक्षक, कर्मचारी वृंद . या ध्वजारोहण प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा मध्ये विविध देशभक्तीपर गाण्यावर नृत्य सादर केले , याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉक्टर स्वानंद कुलकर्णी म्हणाले देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी प्राणाची आहुती दिली , त्यांनी दिलेले बलिदान केलेला त्याग व समर्पण , हे आपण कधीही विसरू नये , व त्यामुळे १५ ऑगस्ट असो अथवा २६ जानेवारी असो अशा या राष्ट्रीय उत्सवानिमित्त , शहीद झालेल्या क्रांतीकारकांचे , स्मरण करणे व त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे आपले कर्तव्य आहे., आपण प्रत्येक जण जरी सीमेवर जाऊन संरक्षण करू शकत नसलो तरी आपण ज्या क्षेत्रात काम करू त्या क्षेत्राच्या माध्यमातून सर्वांसाठी सहकार्य ,सेवा कार्य करून आपले कर्तव्य पार पाडली पाहिजेत असे सांगून सखोल असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉक्टर स्वानंद कुलकर्णी साहेब यांनी या ठिकाणी एक संकल्प केला .

जाहीर प्रगटन

प्र. ९ वे सह दिवाणी न्यायालय क. स्तर बीड यांच्या न्यायालयात

कि.दि.अर्ज ६४/२०२५, रंगनाथ वि. निरंक (मार्फत – ॲड.गणेश शिंदे)

रंगनाथ पि. सोपान काळकुटे, वय – ५३ वर्षे, धंदा – शेती, रा. ससेवाडी ता जि बीड

विरुद्ध

निरक

मागणी: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **सोपान सखाराम काळकुटे व लक्ष्मीबाई भ्र. सोपान काळकुटे** याच वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत **सोपान सखाराम काळकुटे व लक्ष्मीबाई भ्र. सोपान काळकुटे यांचा दिनांक अनुक्रमे ०२/०२/२०२२ व १०/१०/२०२२ रोजी ससेवाडी, ता. जि. बीड** येथे मृत्यु झाला असून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहेत.

मयत **सोपान सखाराम काळकुटे व लक्ष्मीबाई भ्र. सोपान काळकुटे** यांचे निधन झाले मयताचे नंतर अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येत की, सदर अर्जदार सदर मयताचे वारस नव्हत असे कोणास समजविण्यास असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच आत त्यांनी कोटांत हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की जर मदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सटरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिल्यास त्याना मदरहु मयत हे **सोपान सखाराम काळकुटे व लक्ष्मीबाई भ्र. सोपान काळकुटे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७/०१/२०२५रोजी माझे सहीने व न्यायालयाच शिक्क्याने दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १५/०२/२०२५ आहे.

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत) शिक्का
क.लिपीक

जाहीर प्रगटन

मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड

किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ११४/२०२५, CNR No. MHBI0200002232025

आबासाहेब बाबासाहेब चाळक व इतर १० वि . निरंक (मार्फत – ॲड. एस. बी. शिंदे)

अर्जदार :– १. आबासाहेब पि. बाबासाहेब चाळक, वय– ६८ वर्षे, धंदा– शेती, रा. चाकरवाडी ता. जि. बीड २. हरिभाउ पि. बाबासाहेब चाळक, वय–५५ वर्षे, धंदा – शेती, रा. चाकरवाडी ता. जि. बीड ३. मुक्ताबाई भ्र. ज्ञानोबा पिपळे, वय–५५ वर्षे, धंदा घरकाम, रा पालसिंगण ता. जि. बीड ४. सखुबाई भ्र. मधुकर चाळक, वय ६५ वर्षे, धंदा – घरकाम, रा. चाकरवाडी ता. जि. बीड ५. बाळनाथ पि. मधुकर चाळक, वय–३७ वर्षे, धंदा – शेती, रा. चाकरवाडी ता. जि. बीड ६. धनराज पि. मधुकर चाळक, वय–३५ वर्षे, धंदा – नौकरी, रा. चाकरवाडी ता. जि. बीड ७. अनिता भ्र. साहेबराव पवार, वय–४५ वर्षे, धंदा – घरकाम, रा. चाकरवाडी ता. जि. बीड ८. सुनिता भ्र बापुराव पवार, वय–४४ वर्षे, धंदा – घरकाम, रा. चाकरवाडी ता. जि. बीड ९. शोभा भ्र. सुनिल मोटे, वय–४२ वर्षे, धंदा – घरकाम, रा. हातोला ता. वाशी जि. धाराशिव १०. निलावती ग्र. ज्ञानेश्वर डबरे, वय–४० वर्षे, धदा घरकाम, रा. पालसिंगण ता. जि. बीड ११. सत्यशिला भ्र. सभाजी आखाडे, वय – ३८ वर्षे, धंदा – घरकाम, रा. पारगाव ता. वाशी जि. धाराशिव

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार क्र. १ ते ११ यांनी या न्यायालयात गयत बाबा पि. पंढरी चाळक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत बाबा पि. पंढरी चाळक यांचा मृत्यु दिनांक १०/०१/२००० रोजी राहते घरी मौजे चाकरवाडी ता. जि. बीड येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र गिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क. ३ हि मयताची विवाहीत मुलगी आहे व अर्जदार क्र. ४ ही मयताची सून म्हणजे मयताचा मयत मुलगा नागे मधुकर बाबासाहेब चाळक याची पत्नी आहे तसेच अर्जदार क ५ व ६ हे मयताचे नातु म्हणजे मयताचा मयत गुलगा नागे मधुकर बाबासाहेब चाळक याची गुलं आहेत. आणि अर्जदार क. ७ व ११ हे मयताचे नातु म्हणजे मयताचा मयत मुलगा नामे मधुकर बाबासाहेब चाळक याच्या विवाहीत मुली आहेत. मयताची पत्नी नामे द्रोपती भ्र. बाबासाहेब चाळक हया दिनांक ०७/०१/२०२१ रोजी मयत झाले आहे. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत बाबा पि. पंढरी चाळक यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन 'दैनिक मराठवाडा' मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. प्रकरणातील पुढील तारीख २५/ ०२ / २०२५

आज दिनांक २१ माहे जानेवारी २०२५ रोजी

माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत) शिक्का
क.लिपीक

जाहीर प्रगटन

बीड जिल्हयातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार सिध्देश्वर कचरू आमटे रा. खांडेपारगाव ता.जि.बीड यांनी दिलेल्या सुचना व आधिकारावरून या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, शेख समीर शेख सलीम रा. बशीरगंज ता.जि.बीड यांच्या मालकीचा व ताब्यातील बीड येथील बीड नगर परिषद हद्दीतील सावतामाळी चौक वार्ड क्र.२ गट नं. ९ सर्व्हे नं. २२३ तरफ बलगुजार मालमत्ता क्र. २-९-१५८ नगर भुमापन क्र. २७५४ मधील प्लॉट क्रमांक आहे. ज्याची लांबी पूर्व-पश्चिम १५ फुट व दक्षिण-उत्तर ४० फुट आहे. याचे एकूण क्षेत्रफळ ६०० चौ. फुट म्हणजेच ५५.७६ चौ.मीटर आहे. ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे. पुर्वेस : नाना खैरे यांचा प्लॉट, पश्चिमेस : सुरेश राऊत यांचे राहते घर, दक्षिणेस : प्रयाग लॉन्स, उत्तरेस : २० फुट रूंदीचा रस्ता वरीलप्रमाणे नमुद चतुःसिमे अंतर्गत प्लॉट मधील मिळकत त्यामधील दगड, माती व ईतर तदंगभुत वस्तुसह खरेदी करण्याचा व्यवहार शेख समीर शेख सलीम यांच्यासोबत केलेला आहे. व त्या बद्दल त्यांनी आमचे पक्षकार यांचा हक्कात ईसार पावती करून दिलेली आहे. सदर मिळकतीचे लवकरच नोंदणीकृत खरेदीखत करण्याचे ठरले आहे. सदरचा प्लॉट निर्विवाद असल्याचे शेख समीर शेख सलीम यांनी आमचे पक्षकाराला सांगितले आहे. तसेच आमचे पक्षकार किंवा ते सांगतील त्या व्यक्तीच्या नावे नोंदणीकृत खरेदीखत करून देण्याचे ठरले आहे. तरी सर्व जनतेस जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, सदरील प्लॉट बाबत कोणत्याही व्यक्तीचे हितसंबंध जसे की, चोळी, बांगडी, दान, तारण, लीझ, खरेदी-विक्री ईसारपावती बक्षीस, गहाण, ठराव, करार, मालकी, कुळ, चतुःसिमा वाद, मुखत्यारपत्र न्यायालयीन प्रकरणे तसेच इतर काही हितसंबंध असल्यास व काही आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत आमच्या पक्षकाराशी संपर्क साधावा. व मुळ कागदपत्रासह आपला आक्षेप लेखी स्वरूपात नोंदवावा. अन्यथा सदर प्लॉट नमुद मालकाशिवाय इतर कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे समजून पुढील व्यवहार पूर्ण करण्यात येईल व मुदतीनंतर कोणाचाही कसलाही आक्षेप व तक्रार चालणार नाही. सदर प्लॉट मिळकत निर्विवाद व दोषमुक्त आहे असे समजले जाईल.

जाहीर प्रगटन देणार

सिध्देश्वर कचरू आमटे
रा.खांडेपारगाव ता.जि.बीड
मो. ९६२३५१७१८१ / ८९९९५२९७९७

विकसित जिल्हा अशी बीडची ओळख घडवू : क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे

७६ व्या प्रजासत्ताक दिन शानदार सोहळ्यात संपन्न

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अधिकाधिक सर्वांगीण विकास कामे करून विकसित बीड जिल्हा अशी ओळख प्राप्त करून देण्याचे नियोजन आहे. यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज येथे केले.

पोलीस मुख्यालय मैदानावर ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय सोहळा श्री भरणे यांच्या हस्ते पार पडला त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संदीप क्षीरसागर वक्फ बोर्डाचे अध्यक्ष सम ीर काझी, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत तसेच जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने आदींची प्रमुख उपस्थिती होती. या दिमागदार सोहळ्यात पोलिसदलासह होमगार्ड, एन.सी. सी. तसेच स्काऊट गाईड आदींच्या १९ पथकांनी संचलन केले. या परेडचे नेतृत्व बीडचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी केले. ध्वजारोहणा नंतर भरणे यांनी परेडची पाहणी केली. आपल्या भाषणात त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात बलिदान देणारे स्वातंत्र्य सैनिक आणि सीमेवर शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. देशाला पाचवी अर्थसत्ता बनविल्याबद्दल प्रधानमंत्र्याचे त्यांनी आभार मानले. राज्यात ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेला नेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी संकल्प केला आहे. त्याबद्दल त्यांचे व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे त्यांनी आभार व्यक्त केले. आद्यकवी मुकुंदराज यांच्या जिल्ह्यात ध्वजारोहण करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य समजतो असे श्री भरणे यावेळी म्हणाले. खोखो विश्वचषक जिंकून देणारे बीडची कन्या प्रियंका इंगळे तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उंचावणारे बीडचे अविनाश साबळे तसेच राहुल आवारे आणि नवनाथ फरताडे यांचे त्यांनी आपल्या भाषणात कौतुक केले. बीड जिल्हावासियांचे रेल्वेचे स्वप्न केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रयत्नामुळे साकार होत आहे. यामुळे बाजारपेठ जवळ होऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यासह सर्वांनाच फायदा होणार आहे असे सांगणे श्री भरणे यांनी सेंद्रिय शेती तसेच रेशीम शेतीत जिल्हाला प्रथम क्रम ांकावर आणल्याबद्दल शेतकऱ्यांचे अभिनंदन केले.

दिव्यांगांसाठी वाहनावर दुकान योजना

बीड । प्रतिनिधी

सन २०२४-२५ करीता दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने हरीत उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरण स्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल ऑन ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करुण देण्याची योजना लागू करण्यासंदर्भात दिनांक १०/०६/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ,मर्यादित यांच्या स्तरावरुन सुरु आहे. योजनेचा :-दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोई-सुविधा उपलब्ध करुण रोजगार निर्मितीस चालना देणे.दिव्यांग व्यक्तींचे आर्थिक व सामाजिक पुनर्वसन करणे. सर्वसामान्या व्यक्तींप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या परिवार/कुंटुबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे. योजनेचा लाभ राज्यतील गरजू दिव्यांग व्यक्तींना मिळण्यासाठी अर्जदार नाव नोंदणी (अर्ज करण्यासाठी) पोर्टल दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी प्रक्षेपीत करण्यात आले असून दिव्यांग व्यक्तींकडुन ऑनलाईन अर्ज मागविणेसाठी https://register.mshfdc.co.in हि लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर लिंकव्दारे दिव्यांग व्यक्तींनी दि.६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत. सदर योजनेचा लाभ अधिकाधिक दिव्यांग व्यक्तींनी घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळचे व्यवस्थापक यांनी केले आहे.

अनुदान तत्वावर शेळीगट वाटप ३१ जानेवारी पूर्वी अर्जाचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद बीडमार्फत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात २० टक्के जिल्हा परिषद सेस निधीतून मागासवर्गीय लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदान तत्वावर शेळी गट वाटप करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. हे अर्ज पंचायत समितीम ध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. अर्ज जमा करण्याची अंतिम तारिख ३१ जानेवारी २०२५ असून कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत. लाभार्थ्यांची निवड तालुका निहाय लकी ड्रॉ पध्दतीने केली जाईल तरी सर्व तालुक्यातील पात्र मागासवर्गीय लाभार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कलयाण अधिकारी यांनी केले आहे.

बेपत्ता व्यक्तीबाबत निवेदन

बीड । प्रतिनिधी

बापू धोंडीबा कोरडे, राहणार कोरडेवाडी, तालुका केज, जिल्हा बीड यांनी पोलीस स्टेशन केज जेथे तक्रार दिले आहे की, त्यांचा मुलगा विरेंद्र बापू कोरडे, वय ३५ वर्षे हा दिनांक ३०. ६.२०२४ रोजी रात्री ११.०० वाजता घरातून कोणाला काही न सांगता निघून गेला आहे तो अद्यापपर्यंत घरी आलेला नाही. मित्रास व नातेवाईकांना विचारपूस केली असता त्याचा शोध घेतला परंतु मिळून आला नाही त्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे. रंग सावळा, उंची साडेपाच फूट, कपडे लाल रंगाचा शर्ट, पांढरी पॅन्ट, पायात चप्पल, भाषा मराठी, हिंदी तरी वरील वर्णनाची व्यक्ती कुणास आढळून आल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केज पोलीस ठाण्याचे पोलीस तपासी अंमलदार एम.बी. सोनवणे यांनी केले आहे. संपर्कसाठी पत्ता पोलीस स्टेशन केज, फोन क्रमांक ० २४४५-२९५१०० पोलीस चौकी अंमलदार एम.बी. सोनवणे, पोलीस स्टेशन केज मोबाईल क्रमांक ९९२२४४२२३० यावर माहिती कळवावी.

श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे प्रजासत्ताक दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे दिनांक २६ जानेवारी २०२५ वार रविवार रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने झाली. या कार्यक्रमासाठी शाळेचे अध्यक्ष श्री पारगावकर सर ,श्रीमती स्नेहा पारगावकर मॅडम ,सचिव पाशा सर , उप मुख्याध्यापिका श्रीमती अनिता सूर्यवंशी मॅडम, श्री अनिल नाना धांडे, निवृत्त पोलीस अधिकारी पालवे सर आणि सर्व शिक्षक वृंद आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने शाळेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये डंबेल्स ,लेझीम ,देशभक्तीपरगीते तसेच वंदे मातरम या गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले आणि आणि या नृत्याची निवड झाली आणि पोलीस ग्राउंड वर हे नृत्य आपल्या शाळेतील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट सादर केले. तसेच आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी अगदी छोटा गट ते इयत्ता आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली यामध्ये हिंदी ,इंग्रजी, संस्कृत आणि मराठी इत्यादी भाषांचा समावेश होता. चिमुकल्याच्या भाषणांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले.

श्री नारायण विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे २६ जानेवारी रोजी श्री नारायण मा. व उच्च मा. विद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला . प्रमुख पाहुणे मा. प्रा. दीपकराव लाटे सर यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा, प्राचार्य तथा संस्थेचे सचिव अमोल काळे सर, माजी प्राचार्य विनायक ढास सर, सौ. राजश्री काळे/ पिंगळे मॅडम, श्री आत्माराम रुपनर, श्री सर्जेराव रुपनर, पंकज देवडे, राजेंद्र रुपनर यावेळी अनेक मान्यवर ,ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर बहारदार गीत आणि नृत्य सादर केले.विविध खेळात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चव्हाण सर यांनी केले तर सूत्रसंचालन करपे सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. भुतावळे मॅडम यांनी मानले.

७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन देवगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे साजरा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथे ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला आहे या कार्यक्रमा प्रसंगी उपस्थित देवगाव नगरीच्या उपसरपंच सौ. सुषमा महादेव सुरवसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला ग्रा. पं. सदस्य राहुल सुरवसे गणेश गवळी जोतीराम ईतापुरे. गवळी ज्ञानेश्वर यांच्या हस्ते महाम नव च्या प्रतिमा पुजन करण्यात आले

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर जगातील कोणताही आर्थिक ओळख नाही अशा स्थितीत असणारा आपला देश आता जगातील पाचवी अर्थ सत्ता बनला आहे. याच पार्श्वभूमीवर आपल २६ जानेवारीला ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत या निमित्ताने देशाच्या विकासाची वाटचाल आणि त्याला असलेले संविधानाचे अधिष्ठान अधिक प्रभाविक पणाने कार्यरत असल्याचे जाणवते आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर राज्य घटना अर्थातच संविधान लिहिण्याचे काम सुरू झाले या संविधानस स्वीकार करून आपण संघराज्य हे देखील सार्वभौम प्रजासत्ताक दिन म्हणून घोषित केले.

जोधाप्रसादजी मोदी विद्यालयात देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील जोधाप्रसादजी मोदी विद्यालयात भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जेष्ठ समाजिक कार्यकर्ते राजेंद्र मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण प्रसंगी संस्थापक राजकिशोर मोदी, म ार्गदर्शक प्रा वसंत चव्हाण, कापूस पणन महासंघाचे संचालक ऍड विष्णुपंत सोळंके, अंबाजोगाई पिपल्स बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी, संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी,चंद्रकांत गायकवाड, मुख्याध्यापक आनंद टाकळकर, विनायक मुंजे यांच्यासह शाळेतील सर्व विद्यार्थी तथा शिक्षक उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनी प्रथमतः राष्ट्रापिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस वंदन करून राजेंद्र मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण झाल्यानंतर सामूहिक संविधान वाचन करण्यात आले. संगीत शिक्षक शिनगारे यांनी महाराष्ट्र गीत गायले. त्यानंतर राजकिशोर मोदी व राजेंद्र मोरे यांनी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. ध्वजारोहण कार्यक्रमासाठी अंबाजोगाई शहरातील राजकिशोर मोदी यांचे सर्व सहकारी कचरूलाल सारडा, किशोर परदेशी, विलास जाधव, रवि परदेशी, दिनेश भराडीया , सुनील वाघाळकर आदि उपस्थित होते.

बालविवाह मुक्त भारत रॅली संपन्न

किल्ले धारूर । प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग विशेष वार्षिक शिबिर २०२४-२५ अंतर्गत दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी मौजे अंजनडोह या गावातून बालविवाह मुक्त भारत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी व नूतन माध्यमिक विद्यालय अंजनडोह येथील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. या रॅलीमध्ये मुलांनी बालविवाह मुक्त भारत, सशक्त भारत अशा घोषणांनी संपूर्ण गावातील परिसर निनादला. त्यानंतर बौद्धिक सत्रांमध्ये प्रा. स्मिता बसोले, प्रा. नागोराव वाघमारे, प्रा. विनायक कापावार यांनी बालविवाह मुक्त भारत या विषयावर व्याख्यान दिले. दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी संपूर्ण गावातील स्वच्छता फेरी काढून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या माध्यमातून संपूर्ण गावातील परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच संपूर्ण गावातील प्लास्टिकच्या बाटल्या व इतर प्लास्टिक घनकचरा संकलित करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात आले. संपूर्ण गावातील सार्वजनिक परिसराची विद्यार्थ्यांनी श्रमदानाच्या माध्यमातून स्वच्छता केली. या श्रमदानाच्या कार्यक्रमात गावातील सरपंच प्रमोद सोळंके, उपसरपंच प्रकाश सोळंके, ग्राम पंचायत सदस्य श्री. सुधीर सोळंके यांच्यासह गावातील इतर सर्व नागरिक व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्ता जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

बीड शहरामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी मोहीम राबवून ३२६ केसेस करण्यात आलेले आहेत त्यामध्ये नो पार्किंगच्या ७० केसेस फॅन्सीनंबर प्लेट ८९ केसेस ब्लॅक फिल्म आठ केसेस विदाऊट लायसन ८२ केसेस अशा प्रकारे विविध हेड खाली केसेस करण्यात आलेले आहेत तसेच २१ सायलेन्सर जे की मोठे आवाज करून प्रदूषण निर्माण करत होते असे काढून घेण्यात आलेले आहे सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप व वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार बापू जावळे विष्णू काकडे नितीन शिंदे दत्ता उबाळे सचिन साळवे तसेच पोलिस अंमलदार अजिनाथ मुंडे अनिकेत घुले महिला पोलिस अनिता पवार अशांनी केली आहे.

श्री व्यंकटेश इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी महाराष्ट्रात नाव कमावतील : सोमनाथ माने पाटील

पिंपळनेर । प्रतिनिधी

पिंपळनेर व परिसरातील गरीब लेकरांना इंग्लिश मीडियम शिक्षण मिळावे म्हणून उइउ पॅटर्न ग्रामीण भागात सुरू होणे ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट असून निसर्गरम्य वातावरणात सुरू असलेली ही शाळा, प्रशस्त इमारत व तज्ञ शिक्षक ही या शाळेची खास वैशिष्ट्य असून या शाळेतील विद्यार्थी भविष्यात नक्कीच महाराष्ट्रात नाव कमावतील असा विश्वास सोमनाथ पाटील यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला.प्रजासत्ताक दिनानिमित्त पिंपळनेर येथील श्री व्यकटेश इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल येथे यामध्ये कवायती, देशभक्तीपर गीते,आर्मी परेड, मुला मुलींचे स्पीच तर क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.

केसु पैसे देईना बँकेतच येईना

खाजगी बँकेत पैसेच मिळत नसल्याने बँक खातेदारांत संताप

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील खाजगी बँकेतून आर्थिक अडचणी येत आहेत त्यामुळे बँके अर्थिक अडचणींवर सापडली असल्याने खातेदारांची चांगलीच तारांबळ होत आहे.खाजगी बँकेत कॅश पुरवठा करण्यास हात आखडता घेतल्याने दर दिवसाला होणारा लाखांवरला व्यवहार हजारांवर आला आहे. यामुळे खातेदारांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागत आहे. या बँकेत मुख्य खातेदार व्यापारी व सर्वसामान्य घरातील मोल मजुरी करणारे लोक व असल्याने व आर्थिक व्यवहारातून होणारे होण्यास मोठा अडथळा निर्माण झाला आहे म्हणून बँकेत पैसे असून वेळप्रसंगी मिळत नसल्याने खातेदार व पिग्मी प्रतिनिधी आर्थिक संकटात सापडले आहे.

यातच ग्राहकांना लागेल तेवढी कॅश मिळत नसल्याने खासगी बँकेचे कर्मचारी व ग्राहक यांच्यात नेहमी तंटे होत आहेत. यामुळे या बँकेचे आर्थिक गणित कोलमडले आहे. त्यातच खातेदारांना वेळेवर पैसे मिळत नसल्यानेखातेदारांची व खास शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती विस्कटली जात आहे. केसु पैसे देईना बँकेतच येईना असेच म्हणायची वेळ आता खातेदारांवर आलेली असुन गेल्या काही दिवसांपासून संबंधित केसु लपंडाव खेळत खातेदारांना झुलवत ठेवुनी सबसेल दिशाभूल करण्याची संधी ते साधंत आहे त्यामुळेच तुझं माझं जमेना तुझ्या वाचून करमेना असा व्यवहार संबंधित केसू करत असल्याने खातेदारात संताप व्यक्त केला जातोय मात्र निश्चितच अवघ्या काही दिवसात व्यवहार सुरळीत होईल असे बोलून दिवसेंदिवस वाढतच चाललेली बँकेची अर्थव्यवस्था ढासळलेली आहे म कर संक्रांतीच्या सणापासून एक म हिला गोल्ड लोन सोडवण्यासाठी गेल्या बारा दिवसापासून ये -जा करतेय त्या महिला खातेदांराचे सोने अजूनही संस्थेने दिले नाही हे दुर्दैव ! या महिला खातेदाराकडून आधीच पैसे भरून घेतले आणि दुसरीकडून त्या महिलेला म ानसिक तणावाखाली आणलें तर दुसरीकडे सहकारातला केसु पैशाचा लपंडाव खेळत असल्याने या लपंडावात सर्वसामान्य खातेदार होरपळतोय!